मा-महालक्ष्मी - 93/6/54

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( ______________ विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

(8)

९५/९६

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०७/२०१५.

## मा. विशेष महासभा

**मा. विशेष महासभा सूचना क्र. :- ०४, दिनांक ०६/०७/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ---------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सोमवार दि. १३/०७/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. ०६/०७/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. विशेष महासभा सुचना क्रमांक ०४, दि. ०६/०७/२०१५ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. १३/०७/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५६ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहा. नगररचनाकार हे पद महानगरपालिकेमार्फत भरणे सह कनिष्ठ अभियंत्यांना "शाखा अभियंता" म्हणून श्रेणीवाढ देणेबाबत. |
| ५७ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे - चेणे व वरसावे गावासाठी चटई क्षेत्र निर्देशांक १.० मंजूर होणेबाबत. |
| ५८ | बी. एस. यु. पी. योजनेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. (मा. महासभा दि. ०१/०७/२०१५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ३१) |
| ५९ | मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४, २७,२८,११०/५पै या जागेचा मे. काऊनटाऊन यांना देण्यात आलेला करारनामा रद्द करणेबाबत. (मा. महासभा दि. ०१/०७/२०१५ रोजीचे प्रकरण क्र. ५१) |
| ६० | एस. पी. एम. एल. कामाबाबत आढावा घेणे. |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०६ जुलै २०१५

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १३ /०७/२०१५

## || गोषवारा ||

**प्रकरण क्र. (५६) :- महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहा. नगररचनाकार हे पद महानगरपालिकेतर्फे भरणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागून असून दि. १२/०६/१९८५ रोजी "ब" वर्ग नगरपालिकेची स्थापना झालेली आहे. त्यानंतर दि. २८/०८/१९९६ रोजी नगरपालिकेचे "अ" वर्गात रूपांतर होवून दि. २८/०२/२००२ पासून "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १,७५,३७२ व सन २००१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५,२०,३८८ व सन २०११ च्या जनगणणेनुसारची लोकसंख्या ८,१४,६५५ असून सद्यस्थितीत सुमारे ११ लाख आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी "सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम" शासनाने मार्च २०१४ मध्ये मंजूर केलेले असून सदरच्या नियमाप्रमाणे सहा. नगररचनाकारची सर्व १००% पदे प्रतिनियुक्तीने भरणेची तरतूद मंजूर आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा. नगररचनाकाराची दोन पदे मंजूर असून एक पद शासनाने तात्पुरत्या स्वरूपात एका वर्षासाठी नगररचनाकार म्हणून दर्जोन्नत करून श्री. दिलीप घेवारे, नगररचनाकार यांची महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नियुक्ती केलेली आहे. तसेच उर्वरित सहा. नगररचनाकार हे पद रिक्त आहे. दि. ०१/०७/२०१५ रोजी झालेल्या महासभेतील चर्चेनुसार दोन पैकी एक पद महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंत्यामार्फत पदोन्नतीने भरणेचे ठरले. तसेच प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त करण्याचेही निर्देश महासभेने दिले. त्यानुसार सहा. नगररचनाकार दोन पदांपैकी एक पद प्रतिनियुक्तीने व एक पद पदोन्नतीने भरणे प्रस्तावित आहे.

तरी मंजूर सेवा भरती व सेवांचे वर्गीकरणाच्या नियमामध्ये सहा. नगररचनाकारच्या मंजूर दोन पदांपैकी एक पद पदोन्नतीने भरणेसाठी दुरूस्ती होणेस व त्यानुसार शासनास प्रस्ताव पाठविणेस मा. महासभेची मंजूरी मिळणेस विनंती आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Transport\Ghoshwara.docx

गोषवारा प्राप्त दि. 8/7/2015 वेळ : 11:05
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र ......046..........
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१३/०७/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (५७)– महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणे – चेणे व वरसावे या गावासाठी चटई क्षेत्र निर्देशांक १.० मंजूर होणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून महानगरपालिका क्षेत्राची एकूण व्याप्ती ७९४०.५६ हेक्टर (७९.४० चौ.कि.मी.) इतकी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका मुंबई उपनगरास लागुन आहे. दि.१२/०६/१९८५ रोजी "ब" वर्ग नगरपालिकेची स्थापना झालेली असून दि.२८/०८/१९९६ रोजी नगरपालिकेचे "अ" वर्गात रूपांतर होवून दि. २८/०२/२००२ पासुन "ड" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे. सन १९९१ च्या जनगणनेप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकसंख्या १,७५,३७२ व सन २००१ नुसार लोकसंख्या ५,२०,३८८ होती. सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या ८,१४,६५५ असून सदयस्थितीत सुमारे ११ लाख आहे.

मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास योजनेमध्ये १९ गावांचा समावेश असून या गावापैकी उत्तन, पाली, चौक, डोंगरी, तारोडी, चेणे, वर्सावे या गावातील गावठाण वगळता उर्वरीत भागामध्ये मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० अनुज्ञेय आहे.

मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. लोकसंख्या वाढी बरोबरच शहरात रहिवासी इमारतीची बांधकामे वाढणे क्रमप्राप्त आहे. महानगरपालिका क्षेत्राची नैसर्गिक संरचना पाहता, महानगरपालिका विस्तारास वाव नाही. CZMP नकाशानुसार बहुतांश क्षेत्र सि.आर.झेड. ने बाधीत होत आहे. त्यामुळे विकासावर निर्बंध आलेले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन, चौक, पाली, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) ची नियुक्ती झालेली आहे.

यास्तव सदरची पाच गावे वगळता उर्वरीत चेणे व वर्सावे ही दोन गावे शिल्लक राहत आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील विकसनशिल भागापैकी बहुतांश भाग सी.आर.झेड. ने बाधीत होत असून सी.आर.झेड ने बाधीत नसलेल्या भागाचा जवळपास विकास झालेला आहे. मिरा भाईंदर शहर मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीलगत असल्यामुळे तसेच पश्चिम रेल्वे लगत असल्यामुळे मुंबई

शहरातील काम करणाऱ्या लोकांची राहणेसाठी पसंती मिरा भाईदर शहराकडे आहे. तसेच महानगरपालिका क्षेत्रामधील विकास योजनेने बाधीत क्षेत्रासाठी दुप्पट क्षेत्राचे विकास हक्क प्रमाणपत्र देणेबाबत शासनाने सुचना प्रसिध्द केलेली आहे. सदरचे फेरबदल मंजूर झाल्यास विकास हक्क प्रमाणपत्रान्वयेचे फार मोठे क्षेत्र तयार होवून सदरच्या विकास हक्क क्षेत्राचा वापर होणेसाठी जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

यास्तव मिरा भाईदर शहाराच्या हद्दीमधील इतर गावाप्रमाणे उर्वरीत चेणे व वरसावे या दोन्ही गावासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ०.५० ऐवजी १.० प्रमाणे होणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करणेस मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

6/10/15

आयुक्त

मिरा भाईदर महानगरपालिका